# दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप.क्रेडिट सोसायटी मर्यादित, मुंबई

(नोंदणी क्र.बी ओ एम/आर एस आर/३५४/३.६.६७)
युनियन बँक बिल्डिंग, ४ था मजला, रुम नं.११, मुंबई समाचार मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.दूरध्वनी क्र. २२६२९४८४, ३५११४२४६/५२
WhatsApp No.: ९८३३१८५५८४ / ईमेल : ubicrsoc@gmail.com / Website : unionbankcreditsociety.com / Play store : UBI CR SOCIETY

## ५४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

**(फक्त सभासदांसाठी)**

दि युनियन बँक ऑफ इंडिया एम्प्लॉईज को-ऑप.क्रेडिट सोसायटी मर्यादित संस्थेची सन २०२१-२२ यावर्षाची ५४ वी वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, दिनांक ०४ जून, २०२२ रोजी सायं ठीक ४:३० वाजता रामा ॲण्ड सुंदरी वाटुमल ऑडिटोरीयम, किशनचंद चेलाराम कॉलेज (के. सी. कॉलेज), दिनशॉ वाच्छा रोड, चर्चगेट, मुंबई -२० येथे आयोजित करण्यात आली आहे. कृपया सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित रहावे ही नम्र विनंती.

### सभेपुढील विषय सुची

१. दिनांक ३० ऑगष्ट, २०२१ रोजी झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२. ५४ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित सभासदांची गैरहजेरी क्षमापित करणे.
३. सन २०२१-२०२२ यावर्षाच्या मान्य अंदाजपत्रकीय तरतुदीपेक्षा जास्त झालेल्या खर्चास मान्यता देणे.
४. सन २०२१-२०२२ यावर्षाचा अहवाल, नफा-तोटा व ताळेबंद पत्रकांस मंजुरी देणे.
५. सन २०२१-२०२२ यावर्षासाठी मा.संचालक मंडळाने सुचविलेल्या नफा वाटणीस मान्यता देणे.
६. सन २०२१-२०२२ यावर्षाच्या वैधानिक लेखापरिक्षण अहवाल व त्यावरील दोषदुरुस्ती अहवालाची नोंद घेणे.
७. सन २०२२-२३ वर्षाकरीता वैधानिक लेखापरिक्षकांची नेमणूक करणे.
८. सन २०२२-२३ या वर्षाकरीता अंतर्गत व कर लेखा-परिक्षकांची नेमणूक करणे व मानधन ठरविणे.
९. सन २०२२-२३ या वर्षाच्या मा. संचालक मंडळाने शिफारस केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणे.
१०. मासिक भागवर्गणी रु. ५००/- वरुन रु. १०००/- करण्यास मान्यता देणे.
११. मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी येणा-या विषयांवर विचार करणे.

व्यवस्थापक समितीच्या आदेशावरुन,



**(प्रशांत सुर्वे)**
मानद् सचिव

ठिकाण : मुंबई
दिनांक : १७/०५/२०२२

**सूचना :**

१. गणसंख्येअभावी सभा तहकूब झाल्यास सदरची सभा अर्ध्या तासाने घेण्यात येईल व त्यास गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही.
२. वार्षिक सर्वसाधारण सभेपुढील विषयासंबंधी काही प्रश्न असल्यास त्या दि.२७/०५/२०२२ पर्यंत लेखी स्वरुपात आणून देणे.
३. संस्थेचा वार्षिक अहवाल, ताळेबंद व नफा तोटा पत्रक संस्थेच्या मुख्य कार्यालयात कार्यालयीन वेळेत सभासदांना पाहण्यास उपलब्ध आहे. तसेच संस्थेच्या वेबसाईटवर उपलब्ध आहे.
४. उपविधी क्र. घ.१.३ (४) अनुसार लाभांश जाहीर झालेल्या तारखेपासून तीन वर्षाच्या मुदतीत स्विकारावा अन्यथा संस्थेच्या राखीव निधीत जमा करण्यात येईल. २०१८-१९, २०१९-२०, २०२०-२१ सालातील लाभांश अद्याप घेतला नसल्यास ३१ डिसेंबर, २०२२ पुर्वी संस्थेत संपर्क करावा.

**२०२२-२३ सालाचे सभासद सहकार प्रशिक्षण हे वार्षिक सभेच्या ठिकाणी दुपारी ३:४५ वाजता आयोजित केले आहे**